



# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २७५ वा ❑ बुधवार दि.३१ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## मतदारांनो, कोणत्याही अमिषाला बळी न पडता मतदान करा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

लोकशाहीत निवडणुका स्वतंत्र, निःपक्ष व निर्भित व्हायला पाहिजे. लोकमत हे मातातून व्यक्त होत असते. लोकमत व्यक्त करण्याचे साधन म्हणजे मतदान. देशातील नागरिकांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आपल्या मताधिकाराचा वापर केला पाहिजे. लोकशाहीत हीच अपेक्षा असते. मात्र मतदार पैशाच्या अमिषाला बळी पडतात आणि आपली मत विकतात. हा प्रकार आताचा नसून भारतात १९५२ साली झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांपासून ते मे २०२४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत पैशांच्या वापराबद्दल ओरड व टीका झालेली दिसून येते. तरीही यात फारसा काहीही बदल झालेला दिसत नाही. उलटपक्षी काही अभ्यासक तर असे दाखवून देतात की प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकांत विधानसभेच्या निवडणुकीत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात पैशांचावापर होतो.

उमेदवाराच्या बाजूनं मतदान करण्यासाठी मतदारांना प्रोत्साहित करणाऱ्या घटकांमध्ये साधारणतः उमेदवाराची ओळख, पक्ष त्याची विचारसरणी, जात, निवडणूक चिन्ह,कामगिरी किंवा वांशिकता हे घटक मतदारांना प्रभावित करतात.मात्र या घटनां व्यतिरिक्त पैसा हा घटक आता जास्त प्रभावित होत आहे.गरीब आणि असुरक्षित मतदारांचं मत वळवण्याकरिता लाचेच्या स्वरूपात पैसे देऊन मतदान प्रभावित करणं ही सुद्धा एक मतदानाची पद्धत राजकीय

अवलंबतात. निवडणुकांच्या काळात मत खरेदी करण्यासाठी पैसे किंवा इतर वस्तू देण्याचे प्रकार भारतात होत असतात. याचं एक मुख्य कारण म्हणजे राजकारणात भयानक स्पर्धा निर्माण झाली आहे.याचा प्रत्यय सर्व प्रकारच्या निवडणुकांमध्ये मिळतो.


कर्नाटकातील निवडणुकांच्या आधी सरकारी यंत्रणेनं दोन कोटी डॉलर्सहून अधिक पैसे आणि इतर प्रलोभनांचा खुलासा केला. जो आतापर्यंतचा सर्वांत मोठा कारनामा मानला जातो. एका अहवालानुसार, आपल्या उमेदवाराला मतदान करण्याचं आश्वासन देणाऱ्या मतदारांच्या बँक अकाऊंटमध्ये कार्यकर्त्यांतर्फे पैसे जमा करण्यात येत होते. जर उमेदवार विजयी झाला तर आणखी जास्तीचे पैसे दिले जातील, असं आश्वासनही मतदारांना दिलं जातं होतं.

निवडणुकीतली स्पर्धा उमेदवारांना रोख रक्कम किंवा दारू यासारखी विविध आमिषं देण्यासाठी प्रोत्साहित केल्या जात असते.

लोकशाही प्रक्रियेला सुदृढ करण्यासाठी मतदान करणे हे सामाजिक कर्तव्य असले, तरी या कर्तव्याच्या आडून आपला हक्क पैशाने विकण्याचा पायंडा समाजात रूढ होत आहे. या प्रकारात एक विशिष्ट वर्ग असल्याचे यापूर्वी बोलले जात असले, तरी पैशांचा मोह बाळगणारा मोठा वर्ग आता समोर आला या वर्गातून नि:संकोचपणे पैसे मागण्यासाठीची धडपड मतदान होण्याच्या दोन दिवसांपासून सुरू करताना दिसतात. राजकीय पदाधिकारी याद्या बनवून मतदारांची फर्माईश पूर्ण करतात.

मतदारांनो नगरपालिका व नगर पंचायतीच्या निवडणुका झाल्या..यात काही ठिकाणी मध, पैसा चालला..मतदारांना पैशाचे वाटप करण्यात आले आणि मतदारांनी थोड्या पैश्यासाठी आपले मत विकले..अशा बातम्या वर्तमान पत्रांमधून भरभरून आल्या..मात्र मतदारांनो आपले मत विकु नका.

आमिष, प्रलोभन, पैसा, दडपण, भेटवस्तू यासारख्या कुठल्याही मोहाला बळी न पडता सामाजिक व संसदीय लोकशाहीसाठी आवर्जून मतदान केले पाहिजे. 'मतदान करणे म्हणजे संविधानाचा सन्मान राखणे,' हाच सन्मान मतदारांकडून घटनाकारांना अपेक्षित आहे.आता महाराष्ट्रात महानगर पालिकेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत.. लोकशाहीनं जो मतदानाचा अधिकार आणि हक्क दिला आहे तो प्रत्येकानं प्रामाणिकपणे बजावला पाहिजे, असं वारंवार जाहिरातीच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे. आता महानगरपालिकेसाठी मतदारांनी न चुकता मतदान करावं, तुमचं मत अमूल्य आहे... पैसा अथवा तत्सम किरकोळ आमिषाला भुलून मतदान करू नका. निवडणुकीत दिलेले मत म्हणजे आपली इच्छा आकांक्षांचा आवाज आहे. हा आवाज दुर्बल होऊ देऊ नका, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निष्पक्ष आणि निर्भीडपणे मत द्या. प्रलोभनमुक्त निवडणुकीचा निर्धार करू, उत्सव लोकशाहीचा साजरा करू या.




# नाट्यश्रीचे कविसंमेलन म्हणजे कवींचे हक्काचे व्यासपीठ - सुनील श्रीराम पवार

## कविता अशी लिहावी - सिध्दार्थापासून सुरु होवून गौतमापाशी थांबावी

**ज्योतिर्मय साहित्य**

**गडचिरोली (चुडाराम बल्हारपुरे)–** स्थानिक नाट्यश्री साहित्य कला मंच गडचिरोलीच्या वतीने मेहकर (जि.बुलढाणा) येथील निवासी, महाराष्ट्रातील प्रसिद्ध व महामृत्युंजय पुरस्कार प्राप्त कवी डॉ. सुनील श्रीराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली, ज्येष्ठ कवी रामराज करकाडे (गडचिरोली) व नागोराव सोनकुसरे (नागपूर) यांचे उपस्थितीत नुकतेच कविसंमेलन घेण्यात आले. मंचावर नाट्यश्रीचे दादा चुधरी व नाटककार चुडाराम बल्हारपुरे इ. उपस्थित होते.

नाट्यश्रीचे हे कविमंच म्हणजे झाडीपट्टीसह महाराष्ट्रातील कवींचे हक्काचे व्यासपीठ असून यावर कवींचा योग्य तो सन्मान केला जातो व नव्या जुन्या कवींना योग्य ती संधी दिल्या जाते. नाट्यश्री चा हा उपक्रम १९९७ पासून अव्याहत सुरू असून संमेलन दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण असते, हे संमेलन पुढेही असेच चालू राहावे,असे मत सुनील पवार संमेलनाध्यक्ष यांनी व्यक्त केले.

सर्वप्रथम नाट्यश्रीच्या रानगर्भातील रानफुले या कवितेकरीता वाहिलेल्या



गृपवरुन सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या मासिक उत्कृष्ट कवी व कविता या उपक्रमांतर्गत पाच सत्रातील पंधरा पुरस्कृत कवींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अक्षरधन व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. त्यात पहिल्या सत्रातील संजय कुनघाडकर(चामोर्शी), कृष्णा कुंभारे (वरुड, जि. अमरावती), वंदना सोरते (गडचिरोली), दुसऱ्या सत्रातील राजेंद्र पेटकर (इंदिरानगर,गडचिरोली), सुनील बावणे - नील (बल्लारपूर), सौ. सुरेखा बोरकर (नागपूर), तृतीय सत्रातील - सुजाता एन. अवचट (आरमोरी), राजेंद्र यादवराव सोनटक्के (गडचिरोली), पुरुषोत्तम दहिकर (गडचिरोली), चौथ्या सत्रातील - बाबुलाल पुराजी राठोड (पुसद, जि. यवतमाळ), प्रिती ईश्वर चहांदे(सिंदेवाही, जि. चंद्रपूर), सुभाष धाराशिवकर (वाकड, पुणे), व पाचव्या सत्रातील - कु. समृध्दी पाथर (देऊळगाव, जि. गडचिरोली),सौ.मनिषा कुंजाम (सोनसरी, जि. गडचिरोली) व अशोक कांबळे, नागपूर यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले.

या कविसंमेलनात पुसद, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोलीसह संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण ऐंशी कवींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला व आपल्या स्वलिखीत कविता सादर केल्या.

कवितेचे विविध विषय, विविध रंग, प्रेमकविता, भाव कविता, देशभक्ती देशप्रेम, आई व बाप यांची महती सांगणाऱ्या कविता, तसेच सामाजिक जाणिवांसोबत चळवळीच्या कविता, विनोदी कविता सादर करण्यात आल्या. व त्यातून अनेक आशा - अपेक्षा व्यक्त करणारे हे कविसंमेलन होते. अशा या नाविन्यपूर्ण कविसंमेलनास महाराष्ट्रातील ज्येष्ठ श्रेष्ठ तसेच नवोदित कवींनी हजेरी लावून आपापल्या बहारदार रचना सादर केल्या. व संमेलनात चांगलीच रंगत आणली. या कविसंमेलनात आत्माराम बर्डे, पी.डी. काटकर, राजरत्न पेटकर, पुनाजी कोटरंगे, सोनाली सहारे, भिमानंद मेश्राम,मंगला कारेकर, वंदना मडावी, लता शेंद्रे, विलास जेंगठे, वसंत चापले, खेमदेव हस्ते, पुरुषोत्तम ठाकरे, तुळशीराम उंदीरवाडे, वर्षा गुरनुले, उकंडराव राऊत,भावना रामटेके, नत्थुजी चिमुरकर, डी. के. लक्ष्मण, विजय शेंडे, निळकंठ रोहनकर, रमेश डोंगरे यांचेसह मुंबई,नागपूर, कोल्हापूर, सांगली , सातारा, पुणे इ. सह झाडीपट्टीतील ८० कवींनी आपापल्या स्वरचित कविता सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

कवी संमेलनाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन दिलीप मेश्राम व योगेश गोहणे यांनी केले. कवींचा व पाहूण्यांचा परिचय प्रा. अरुण बुरे यांनी करून दिला. सहभागी सर्व कवींना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी प्रा. अरुण बुरे, योगेश गोहणे, रमेश निखारे, मारोती लाकडे,निरंजन भरडकर,वसंत चापले, दादा चुधरी, राजेंद्र जरुरकर, दिलीप मेश्राम, जितेंद्र उपाध्ये, अशोक सुत्रपवार, हेमंत कावळे, चुडाराम बल्हारपुरे व सौ. कुंदा बल्हारपुरे यांनी मेहनत घेतली

# आजोबांचं बाळ...

**ज्योतिर्मय साहित्य**

सकाळची गडबड सुरू होती. स्वयंपाकघराचं अक्षरशः कुरुक्षेत्र झालं होतं. भांडी, भाज्या, कुकरच्या शिट्ट्यांचे आवाज, मुलांची घाई आणि मनातली अस्वस्थता सगळं एकाच वेळी सुरू होतं. मला दोन हात, दोन पाय कमी पडत होते. अशा गडबडीतच फोन वाजला. क्षणभर चिडचिड झालीच; जरा नाराजीनेच फोन उचलला.

फोन माझ्या बहिणीचा शीतलचा होता. पण ती बोलतच नव्हती, नुसती हसत होती अगदी सातमजली हसू. काही केल्या तिचं हसू थांबेना. मध्येच श्वास घेत, हसू आवरत ती काहीतरी सांगायचा प्रयत्न करत होती. शेवटी महत्प्रयासाने हसू दाबत तिनं सांगायला सुरुवात केली. तिच्या घरी घडलेला एक किस्सा.

शीतलचा मुलगा सौरिश. वय साधारण सहा–सात वर्षं. अत्यंत हुशार, चुणचुणीत आणि अप्रतिम चित्र काढणारा. प्रश्न विचारणं, शंका विचारणं, शब्दांच्या कोट्या करणं हेच जणू त्याचं रोजचं काम. त्यामुळे त्यांच्या घरात असे अनेक गंमतीशीर, कधी गोंधळात टाकणारे तर कधी विचार करायला लावणारे प्रसंग घडतच असतात. त्यातलाच हा एक किस्सा सांगायला तिनं मला फोन केला होता.

घडलं असं होतं. शीतलची एक मैत्रीण गर्भवती असताना काही वेळासाठी त्यांच्या घरी आली होती. तिचं वाढलेलं पोट पाहून सौरिशच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. ''मावशीचं पोट एवढं मोठं कसं?'' हा पहिला प्रश्न. शीतलनं शांतपणे, प्रेमानं त्याला सांगितलं की मावशीला बाळ होणार आहे, म्हणून तिचं पोट मोठं झालं आहे. त्यावर मग सौरिशचे उपप्रश्न सुरू झाले . बाळ कधी येणार, ते आत कसं



राहतं, ते खातं-पितं कसं? तिनं शक्य तितक्या साध्या शब्दांत त्याच्या प्रश्नांची उत्तरं दिली. तिला वाटलं, विषय इथेच संपला.

पण विषय संपला, असं तिला वाटलं होतं; प्रत्यक्षात तो सौरिशच्या मनात खोलवर रुजला होता. पुढेही त्याचा संदर्भ येणार आहे, याची कल्पनाही तिला नव्हती.


त्यानंतरच्या एका संध्याकाळी सौरिश घरात खेळत होता. दारावरची बेल वाजली. नेहमीसारखा तो धावत गेला आणि दार उघडलं. समोर त्याच्या आजोबांचे एक मित्र उभे होते. सौरिशनं हसतमुखाने त्यांचं स्वागत केलं. ते आजोबा सोफ्यावर बसले. थोड्याच वेळात सौरिशनं अगदी खणखणीत आवाजात विचारलं,

''आजोबा, तुमचं बाळ कधी बाहेर येणारै?''

क्षणभर सगळेच गोंधळले. त्या आजोबांना काहीच कळेना हा मुलगा नेमकं काय म्हणतोय? पण शीतलच्या मात्र लगेच लक्षात आलं. तिनं कसंबसं प्रसंग सावरत सौरिशला आत बोलावून घेतलं. पण तो हट्टानं तोच प्रश्न विचारत राहिला ''आजोबांचं बाळ बाहेर कधी येणार?'' त्या आजोबांचं पोट वाढलेलं होतं आणि सौरिशनं आपल्या मावशीच्या अनुभवावरून एकच गोष्ट लक्षात ठेवली होती. ज्यांचं पोट मोठं असतं, त्यांच्या पोटात बाळ असतं. सौरिश




सहा–सात वर्षांचा होता. या वयातली मुलं जगाकडे तर्कशुद्ध नजरेनं पाहत नाहीत; ती अनुभवावर आधारित दृष्टिकोनातून जग समजून घेतात. त्यांना जे दिसतं, जे ऐकू येतं आणि जे त्यांना समजावून सांगितलं जातं, त्यावरून ते स्वतःची एक छोटीशी पण ठाम संकल्पना तयार करतात. सौरिशनं जे पाहिलं ते अतिशय सोपं होतं मावशीचं पोट मोठं आहे, कारण तिच्या पोटात बाळ आहे. **(क्रमशः)**




## जात्यावरच्या ओव्या......

जीवाला नाही बर
डोळा दिसत अंधुक
बोलावरून सांगते
जवळ बसला बंधु ग ||४२३||

जीवाला नाही बर
पडून कंटाळा आला
जाऊनच येते
देवाजीच्या राऊळाला ||४२४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मानवतेचा आणि सेवेचा प्रकाश : डॉ. प्रकाश आमटे





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

त्यांची पुढची पिढीही हा वारसा जपते आहे, पुढे नेते आहे. आपल्या परिसरातील रुग्णांची सेवा करता करता डॉ प्रकाश याना गेल्या वर्षी एका दुर्धर आजाराचा सामना करावा लागला पण सेवाकार्याची पुण्याई पाठीशी असल्याने त्यातूनही ते सुखरूप बाहेर पडले. आदिवासींची सेवा करताना त्यांनी भेदभाव केला नाही. अनेक नक्षलवाद्यांवरही त्यांनी उपचार केले, त्यांचे समुपदेशन केले. भ्रष्ट आणि लाचखोर अधिकाऱ्यांची दूर रवानगी केली.

हेमलकसा येथील शाळा सुद्धा पाहण्यासारखी आहे. अनेक आदिवासी विद्यार्थी या शाळेत जीवनाचे धडे गिरवत आहेत. केवळ पाठ्यपुस्तकी शिक्षण त्यांना इथे दिले जात नाही. शेती करणे, निरनिराळे उद्योगव्यवसाय करणे, निरनिराळी कौशल्ये हस्तगत करणे या गोष्टी त्यांना शिकवल्या जातात. जीवनमूल्ये शिकवली जातात. या विद्यार्थ्यातून अनेक विद्यार्थी शिकून मोठे होऊन आज मोठमोठ्या पदांवर पोहोचले आहेत, तर काही आपल्या आदिवासी बांधवांची सेवा करत आहेत. डॉ प्रकाश आमटे म्हणतात, मी तर केवळ निमित्तमात्र आहे. हे सगळे टीमवर्क आहे. मला सेवाभावी कार्यकर्ते मिळाले म्हणून एवढे मोठे कार्य करणे शक्य झाले. त्यांचे हे उद्गार त्यांची नम्रता



दर्शवतात. डॉ प्रकाश आणि डॉ मंदाताई यांना मॅगसेसे पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार आपल्या कार्यासाठी प्राप्त झाले आहेत. त्यांच्यामुळे या पुरस्काराना मोठेपण लाभले आहे. त्यांनी लिहिलेली प्रकाशवाटा आणि रानमित्र ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणारा डॉ प्रकाश बाबा आमटे- द रिअल हिरो हा सुंदर चित्रपट आहे. यात नाना पाटेकर यांनी डॉ प्रकाश आमटे यांची भूमिका साकारली आहे. त्या चित्रपटातील गुरु ठाकूर यांनी लिहिलेलं गीत अतिशय अर्थपूर्ण आणि सुंदर आहे.


तू बुद्धी दे, तू तेज दे , नवचेतना विश्वास दे,
जे सत्यसुंदर सर्वथा आजन्म त्याचा ध्यास दे

अशाच सत्यसुंदराचा ध्यास घेतलेल्या डॉ प्रकाश आमटे यांना आणि त्यांच्या कार्याला शतशः प्रणाम !

***




## दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### मंगलाचरण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ७ समास १

नमस्कार मित्रांनो

आपण मंगलाचरण या समासाच्या शेवटाकडे आलो आहोत प्रत्येक दशक व प्रत्येक समास आपल्याला जीवनविद्या शिकवून जातो व समर्थांच्या अफाट बुध्दीमत्तेचे आदर व कौतुक वाटते.

ऊत्तरार्धात समर्थ सांगतात की ''अध्यात्म हा अनुभव घेण्याचा विषय आहे.''ज्यांना त्याची तळमळ आहे त्यांनाचं त्याचा अर्थ कळेल. निर्विकारपणे जगत, कुठलेही किंतू परंतू मनात न आणता. जोसाधं पण सरळमार्गी सरधोपट जीवन जगतो जो कुणाचाही द्वेश, मत्सर करत नाही कुणालाही विनाकारण त्रास देत नाही. जो कधीही खोटं बोलत नाही, चहाडीचुगली करत नाही. जो सतत सन्मानाने व समाजाने घालून दिलेल्या आदर्श जीवन पध्दतीने जगतो.

जो चोरी, दरोडे अशी वाईटकर्म करत नाही. समाजातील सर्व थरांतील लोकांशी एकोप्याने वागतो. पद, प्रतिष्ठा, सत्तलोलुपता यांच्या आहारी जात नाही. अशां लोकांना अध्यात्म विषय पटकन कळतो. अभिमानी माणूस वाद वाढवतो समाजामध्ये दुफळी निर्माण करतो.समर्थांच्या मते असे वाईट कर्म कोणीही करू नये।

५० व्या ओवीत एक श्लोक सांगितला आहे त्याचे थोडक्यात विवेचन करून आपण प्रथम समासाचा समारोप करूया.


व्यावसायात्मिका बुध्दिरेकेन।
बहूशाखा हद्दनंताश्च बुद्वयो-व्यावसायिनाम.।

अर्जुना, स्वरूपनिश्चय करणारी बुध्दी एकच असते. ज्यांना स्वरूपनिश्चय करता येत नाही अशा लोकांच्या बुध्दीला खुप फाटे फुटलेले असतात. ज्यांचा मनावर ताबा नाही जो कुठलाही निश्चय करू शकत नाही, ज्याचे चित्त सतत अस्थिर असते. अशा माणसांना आत्मस्वरूपाचे विवेचन काय समजणार.आणि ते कळण्यासाठी मनाची अतिशय सावधानता लागते.चित्त एकाच विषयाकडे लागण्याची शक्ति लागते. सर्व समावेशक ,समाधान असणारे मन असावे लागते.समाधान, सदाचार, सद्विचारांची गाठोडी घेऊन जीवननौका पार करणे म्हणजेच अध्यात्म होय.

समर्थ आपल्याला अध्यात्म म्हणजे काय ते सांगून माया कशी आहे याचे थोडक्यात वर्णन करतात.

**(क्रमशः)**

## भगवंताच्या प्राप्तीची साधने



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

भगवंत आणि आपण ह्यांच्यामध्ये अभिमानाचा पडदा आहे; हा दूर झाला म्हणजे आपल्याला भगवत्प्राप्ती झाली. हा दूर व्हायला अनेक मार्ग आहेत. कर्ममार्ग, हठयोग, राजयोग वगैरे मार्गांनी हा तितका लवकर दूर होत नाही; उलट क्वचित् प्रसंगी वाढतोही. भक्तिमार्ग सोपा आहे. भक्ती म्हणजे भगवंताला अभिमानरहित अनन्य शरण जाणे, भगवंताचे होऊन राहणे, भगवंताशिवाय दुसरे काहीच न दिसणे, सर्वत्र भगवत्प्रचीती येणे. अशी भक्ती प्राप्त होण्याचा मार्ग म्हटला म्हणजे सर्व कर्तृत्व भगवंताकडे देणे, सर्व त्याच्या इच्छेने चालले आहे असे मानणे, आणि आपली प्रत्येक क्रिया त्याला समर्पण करणे. असे केल्याने आपला अभिमान लवकर नाहीसा होतो. हे साधत नसेल तर गुरुआज्ञेत राहणे, म्हणजेच आपला मान, अभिमान, शहाणपण हे सर्व गुंडाळून ठेवून, गुरु सांगतील तसे, सबब न सांगता वागणे. हेही साधत नसेल तर संतांजवळ नुसते पडून राहणे. त्यांच्या सांगण्याने, सहवासाने, अभिमान हळूहळू कमी होतो.

भक्ती दोन प्रकारांनी उत्पन्न करता येते. पहिला प्रकार म्हणजे सर्व सोडून, लंगोटी लावून, ' भगवंता, तू मला भेटशील तेव्हाच मी उठेन, ' अशा निग्रहाने बसणे. हा मार्ग कठीण आहे. प्रापंचिकाला हा साधणार नाही. दुसरा प्रकार म्हणजे सहवासाने भक्ती उत्पन्न करणे. भगवंताचे गुणवर्णन वाचणे, त्याचेच गुण श्रवण करणे, त्याच्या दर्शनास जाणे, प्रत्येक कृत्य भगवंताकरिता करणे, प्रत्येक कृत्यात त्याचे स्मरण ठेवणे; असा त्याचा अखंड सहवास ठेवावा, म्हणजे भगवंताच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न होते. विषयाकरिता केलेली भगवद्भक्ती ही खरी भक्ती होऊ शकत नाही. भगवत्सेवा निष्काम पाहिजे; कारण भक्ती म्हणजे संलग्न होणे. मी विषयाशी संलग्न असतो तेव्हा ती विषयाची भक्ती होते, भगवंताची नाही. तेव्हा, आपण करतो ही भगवंताची सेवा नसून विषयाची सेवा होते हे ठरल्यासारखे झाले; म्हणजे मी विषयाचाच गुलाम झालो. विषयांचा गुलाम होऊन मी विषय कसचे भोगणार ? मालक होऊन विषय भोगावेत. संत, भगवंत हे निरतिशय सुख देणारे आहेत. त्यांच्याजवळ विषय मागणे म्हणजे रामाजवळ भिक्षेचे फडके मागण्याइतकेच वेडेपणाचे नव्हे का ? आपण सेवेचे फळ मागून भगवंताला मात्र दूर करतो. भगवंताची प्राप्ती हेच आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून आपण नेहमी त्याच्याभोवती फिरत असावे. भगवंतामध्ये जे मिसळतात ते परत येत नाहीत, हे लक्षात ठेवावे.

भगवंताच्या प्राप्तीच्या आड येणारे नाहीसे व्हावे म्हणून तळमळणारा जो असतो, त्याचे साधन बरोबर चाललेले असते.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### अविद्या

ज्योतिर्मय साहित्य

''विद्या'' आत्मा, परमात्मा, मोक्ष या विषयांचे ज्ञान देते. हे ज्ञान शाश्वत कायम टिकणारे असते.

''अविद्या'' देह, पदार्थ, इंद्रिय या विषयांचे ज्ञान देते. हे नाशवान किंवा तात्पुरते असते.

''विद्या'' मनुष्याला बंधनातून मुक्त करते. अंतर्मुख बनवते व आत्म्याचा उद्धार करते.

याउलट ''अविद्या'' मनुष्याला बंधनात टाकते. बहिर्मुख बनवते. देहाचे पालन करते.

मंडुकोपनिषद यातील श्लोक

द्वे विद्ये वेदितव्ये- परा चापराच् //

परा विद्या (विद्या) :-ज्या ज्ञानाने अक्षर ब्रह्म समजले जाते.

अपरा विद्या :-ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अथर्ववेद व्याकरण छंद निरुप्त ज्योतिष आणि कल्प म्हणजे लौकिक ग्रंथाधारीत ज्ञान.

''श्वेताशोत्तर उपनिषद ''

मायां तू प्रकृतीं विद्यान्मायीन तु महेश्वरम् //

येथे अविद्या म्हणजेच माया म्हणजेच प्रकृती जी जग निर्माण करते तर विद्याही ईश्वराचे ज्ञान जे मायेच्या पलीकडेल आहे हे देते. माया हीच प्रकृती आहे असे जाणारे आणि त्या मायला उत्पन्न करणारा तिचा अधिष्ठाता परमेश्वर म्हणजेच महेश्वर आहे.

''अविद्येचे परिणाम''

वस्तूचे खरे स्वरूप समजत नाही. मी देह आहे. मी कर्ता आहे. मी भोगता आहे. अशी चुकीची समजूत होते. यामुळे कर्मबंधन, संसार आणि पुनर्जन्म निर्माण होतो.

''अविद्येचा नाश''

अविद्येचा नाश केवळ विद्येने म्हणजेच आत्मज्ञानाने होतो.

अविद्याया मृत्यूं तीर्त्वा विद्यया अमृतमश्रुते* ?

ईशा वास्योपनिषध ११

जसा सूर्य उगवल्यावर अंधार नाहीसा होतो तसेच ज्ञान उगवल्यावर अविद्या नाहीशी होते.

वरील विवेचनातून अविद्या हे मायेचेच अपत्य आहे हे आपण पाहिले आता अविद्या व माया यातील फरकही आपण पाहू.

१ अर्थ:-

अविद्या अज्ञान- आत्म्याचे खरे स्वरूप न ओळखणे.

माया - ईश्वराची सर्जन शक्ती(उत्पादन शक्ती) जी संपूर्ण जग निर्माण करते.

२ *कार्यक्षेत्र:-

अविद्या -जीव (व्यक्तीगत आत्मा )यांच्यावर परिणाम करते.

माया -ईश्वराच्या अधीन राहून संपूर्ण विश्वावर कार्य करते.

३ स्वरुप :-

अविद्या- व्यक्तिगत अज्ञान .मी देह आहे ,मी कर्ता आहे अशी भ्रांती.

माया सामूहिक सर्जन शक्ती, जी विश्व, काळ, कारण, परिणाम निर्माण करते.

४ कारण -कार्य संबंध :-

अविद्या-अविद्येमुळे जीव बंधनात पडतो.

माया-मायेने जगाची निर्मिती होते.

५ नियंत्रण कोणाकडे:-

अविद्या -जीवाच्या अंतकरणावर अधिराज्य करते.

माया -ईश्वराच्या नियंत्रणाखाली काम करते.

**(क्रमशः)**




## थंडीपासून चेहऱ्याचे सौरक्षण

ज्योतिर्मय साहित्य

आपला चेहरा सकाळी उठल्यावर ड्राय आणि डल दिसतो? अनेक कंपन्यांच्या क्रीम आणि लोशन वापरून झाले असल्यावरही चेहऱ्यावर ती चमक येत नाहीये का?* तर आम्ही आज आपल्या घरगुती नाइट फेस मास्कबद्दल माहिती देत आहोत ज्याने आपली त्वचा चमकदार होण्यात मदत मिळेल.

हळद आणि बेसन-

चार चमचे बेसन आणि दोन चमचे दूध किंवा सायीत चिमूटभर हळद मिसळून मास्क तयार करा. हा रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवा. सकाळी गार पाण्याने धुऊन घ्या.

स्ट्रॉबेरी-

व्हिटॅमिन सी आणि फॉलिक ॲसिडने भरपूर स्ट्रॉबेरी त्वचेला निरोगी बनवतं. हे मास्क तयार करण्यासाठी स्ट्रॉबेरी दुधासोबत क्रश करून पेस्ट तयार करा. त्यात एक चमचा बेसन मिसळून चेहऱ्यावर लावा. सकाळी गार पाण्याने धुऊन घ्या. चेहरा चमकदार दिसेल.

ओट्स आणि दही

ओट्स बारीक वाटून त्या एक चमचा दही, एक चमचा मध आणि चिमूटभर हळद मिसळून पेस्ट तयार करा. आवश्यकतेनुसार पाणी मिसळून पेस्ट तयार करा आणि चेहऱ्यावर लावा. सकाळी उठल्यावर धुऊन घ्या.

चंदन

ड्राय, ऑयली आणि पिंपल असलेल्या त्वचेसाठी चंदनाचे मास्क उत्तम आहे. हे लावल्याने खाज दूर होते आणि त्वचा निरोगी राहते. हे मास्क तयार करण्यासाठी चंदन पावडरमध्ये जरा दूध, लॅवेंडर ऑयल आणि दोन चमचे बेसन मिसळा. किंवा आपण फक्त चंदन पावडर ही वापरू शकता. नंतर गार पाण्याने धुऊन टाका. चेहरा ग्लो करेल.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

झेंडू-

झेंडूच्या फुलात ॲंटीसेप्टिक आणि ॲंटीबॅक्टिरिअल गुण असतात. झेंडूचे पाने दुधात भिजवून ठेवा. यात एक चमचा मध मिसळून पेस्ट तयार करून चेहऱ्यावर लावा. सकाळी पाण्याने स्वच्छ करा.

गुलाब-

गुलाबाच्या झाडांची पाने उन्हात वाळवून घ्या नंतर याची पावडर तयार करा. यात दूध, साय मिसळून आवश्यकतेनुसार ग्लिसरीन मिसळा. हा मास्क रात्रभर लावून ठेवा.

लिंबू आणि मध -

दोन चमचे मधात दोन चमचे लिंबाचा रस मिसळून त्वचेवर लावा. रात्रभर चेहऱ्यावर राहून द्या. सकाळी उठून धुऊन घ्या. त्वचा चमकेल.



## लघु बोधकथा

*♦समाधान♦*

*ती म्हणाली कारे तुला मागीतले होते का? तुझ्या समोर हात पसरला होता का? नाही ना? मग का आणलेस तांदूळ? ही पिशवी उचल आणि चालायला लाग तो म्हणाला मला त्या झाडाखाली बसलेल्या साधुने पाठवले आहे म्हणून मी आलोय, ती म्हणाली त्या साधुला जाऊन सांग की अजून दोन दिवस पुरतील एवढे तांदूळ माझ्या झोपडीत आहेत.*

*श्रीमंताने आपली अक्कल चालवली तो म्हणाला म्हातारे तिसऱ्या दिवसाला होतील राहू दे. ती म्हणाली माझ्या तिसऱ्या दिवसाची चिंता तुलाही नको आणि त्या साधुलाही नको त्याला सांग माझ्या तिसऱ्या दिवसाच्या तांदळाची चिंता मी ज्याच्यावर सर्वस्वाचा भार टाकून या निर्जन स्थळी भजन करत बसलेय त्याला आहे.*

*हे ऐकून श्रीमंत पिशवी घेऊन परत आला आणि साधु समोर पिशवी ठेवून निघाला. साधुने त्याला हाक मारली अरे! विवंचना घेऊन आला होतास ना? मी तुला त्यातुन सोडवणार आहे. श्रीमंत खाली मान घालून म्हणाला महाराज मला उत्तर मिळाले तिसऱ्या दिवसाच्या तांदळाची चिंता न करणारी म्हातारी जेवढी सुखी आहे तेवढा मी महामूर्ख दुःखी आहे.*

*तात्पर्य: सुख कशात आहे हेच आम्हाला कळत नाही. तर सुख समाधानात आहे. आणि हे समाधान बाजारात विकत मिळत नाही. ते भगवंताच्या भजनानेच मिळते. भोजनात सुख नसून भजनात सुख आहे. आमच्या जीवनातील भजन नाहीसे झाले आणि आम्ही भोजनाला प्राधान्य दिले म्हणून आम्ही दुःखी आहोत.*

# आयएमए छ. संभाजीनगरचा राष्ट्रीय पातळीवर सन्मान

## डॉ.अनुपम टाकळकर यांचे सक्षम नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर मान्य

**ज्योतिर्मय साहित्य**

**छ. संभाजीनगर –** आयएमए च्या राष्ट्रीय अधिवेशनात छ. संभाजीनगर शहर शाखेला विशेष पुरस्काराने सम्मानित करण्यात आले आहे. हा सन्मान आयएमए राष्ट्रीय अध्यक्ष डॉ दिलीप भानुशाली यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. देशभरातून केवळ मोजक्या आणि निवडक शाखा व सदस्यांनाच हा विशेष गौरव दिला जातो. हा सन्मान नियमित पुरस्कारांच्या पलीकडचा असून त्याचे महत्त्व आणि प्रतिष्ठा अत्यंत उच्च दर्जाची आहे. त्यामुळे हा पुरस्कार आय एम ए चत्रपती संभाजीनगर शाखेसाठी ऐतिहासिक मानला जात आहे. आयएमए छ. संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांच्या सक्षम, दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वसमावेशक नेतृत्वाखाली गेल्या कालावधीत शाखेने उल्लेखनीय कार्य केले. संघटन कौशल्य, नियोजनबद्ध कामकाज, सर्व घटकांना सोबत घेऊन चालण्याची भूमिका आणि सामाजिक बांधिलकी ही डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे राष्ट्रीय पातळीवर अधोरेखित करण्यात आले.

डॉ. अनुपम टाकळकर यांनी अध्यक्षपदाच्या कार्यकाळात आयएमए ही केवळ डॉक्टरांची संघटना न ठेवता ती समाजाशी थेट जोडणारी चळवळ म्हणून पुढे नेली. डॉक्टरांचे प्रश्न, व्यावसायिक सन्मान, वैद्यकीय नैतिकता यासोबतच ग्रामीण आरोग्यसेवा, विशेष गरजू घटक, महिला व बाल आरोग्य आणि जनजागृती यांना समान महत्त्व देण्यात आले. त्यांच्या नेतृत्वामुळे शाखेच्या प्रत्येक उपक्रमाला दिशा, शिस्त आणि सातत्य लाभले.

पुरस्कार प्रदान करताना राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील आयएमए नेत्यांनी शाखेच्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले.

शहर शाखेने कार्यान्वित केलेल्या आयएमए साथी, आयएमए कनेक्ट आणि आओ गांव चले यांसारख्या उपक्रमांची चर्चा उपस्थितांमध्ये होती . या उपक्रमांमागील संकल्पना, अंमलबजावणी आणि समाजावर झालेला सकारात्मक परिणाम याबाबत समाधान व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमात माननीय श्री अमित शाह, गृहमंत्री, भारत सरकार, माननीय श्री भूपेंद्रभाई पटेल, मुख्यमंत्री, गुजरात राज्य आणि माननीय श्री जयेश शहा, अध्यक्ष, आयसीसी याबरोबरच गुजरात विधानसभेचे मा. अध्यक्ष श्री शंकर चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत



आणि मान्यवर पाहुणे म्हणून उपस्थितीमुळे हा कार्यक्रम अत्यंत भव्य आणि ऐतिहासिक ठरला.

आयएमए कनेक्ट या उपक्रमाद्वारे विशेष मुलांसाठी, वृद्धांसाठी आणि गरजू संस्थांसाठी राबवलेल्या आरोग्य तपासण्या आणि समुपदेशन कार्यक्रमांना राष्ट्रीय स्तरावर प्रशंसा मिळाली. आओ गाव चले या उपक्रमातून दत्तक गावांमध्ये राबवलेल्या आरोग्य शिबिरांमुळे ग्रामीण नागरिकांना मोफत तपासणी, औषधे आणि योग्य मार्गदर्शन मिळाले. या उपक्रमांमुळे शहरी आणि ग्रामीण आरोग्यसेवेतील दरी कमी करण्याचा प्रभावी प्रयत्न झाला.

डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वामुळे सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी प्रेरणा, स्पष्ट उद्दिष्टे आणि सकारात्मक कार्यसंस्कृती निर्माण झाली, अशी भावना अनेक नेत्यांनी व्यक्त केली.

हा राष्ट्रीय गौरव आय एम ए संभाजीनगर शाखेला भविष्यात अधिक व्यापक, अधिक प्रभावी आणि अधिक लोकाभिमुख कार्य करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरेल. आय एम ए च्या मूल्यांशी निष्ठा ठेवून समाजसेवा आणि वैद्यकीय व्यावसायिकांचे हित जपण्याचा संकल्प या सन्मानामुळे अधिक दृढ झाला आहे.

हा सन्मान कोणत्याही एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून आयएमए चत्रपती संभाजीनगर शाखेतील प्रत्येक समर्पित सदस्याचा आहे, अशी प्रतिक्रिया डॉ अनुपम टाकळकर यांनी व्यक्त केली.

या पुरस्काराबद्दल डॉ अनुपम टाकळकर यांनी डॉ यशवंत गाडे, डॉ दत्ता कदम, डॉ संतोष रंजलकर, डॉ योगेश लक्कास, डॉ कुलदीप सिंह राऊळ, डॉ पी एम दरक, डॉ देवदत्त पळणीटकर, डॉ उज्वला दहिफळे, डॉ शिवाजी पोले, डॉ केदार साने, डॉ आसावरी टाकळकर, डॉ अर्चना भांडेकर, डॉ शहाजी तौर, डॉ संभाजी चिंतले, डॉ सोनाली सावजी, डॉ अर्चना साने, डॉ संजय पाटणे, डॉ राघवेंद्र चाकूरकर, डॉ विकास देशमुख, डॉ अंजली गाडे, डॉ प्रशांत दरक, डॉ गितेश दळवी, डॉ श्रीगणेश बर्नेला, डॉ प्रतिमा भाले, डॉ कुंदा धुळे, डॉ प्रीती भाग्यवंत, डॉ अनघा दिवाण, डॉ अपर्णा राऊळ, डॉ संगीता शिंदे, आदी मान्यवर सदस्यांचे आभार मांडले.

# शेकोटीच्या गप्पा

**ज्योतिर्मय साहित्य**

पहाटेच सुमारे साडेचारची वेळ. कडाक्याची थंडी पडलेली. हवेतील गारठयाने कळस गाठलेला. हाडं गोठावेत अशी थंडी त्यामुळे पाहावं तिकडे माणसं अंगावर स्वेटर, कानटोप्या, घोंगडी, रग, शालीचे पांघरुन घालुन फिरत होती. त्यात पहाटेचा प्रहरी साडेचारच्या वेळेला सदा शेकोटी पेटवून बसलेला होता. शेकोटीच्या धुराचे लोट त्या थंडगार हवेच्या गारठयामध्ये मिसळत होते. धुपणाऱ्या जळणातून निघणारा धूर डोळयाची जळजळ करुन पुढे जात होता. त्याच शेकोटीच्या गरमीमध्ये हाताच्या करंगळीच्या जवळ बिडी धरुन मुठीतून झुरके मारुन सदा धूर आकाशाच्या रोखाने फेकीत होता. बिडीचा धूर त्या शेकोटीच्या धुरात मिसळून परसत होता. जळालेल्या लाकडाचा कोळसा झाला की लाकूड आणखी थोडसं पुढे सरकवून जाळ करुन हाताला आणि पायाला शेक घेत असतानाच रगाचे पांघरुन घेऊन हातात शौचासाठी तांब्या घेऊन एक माणूस त्यास जुडला.

तांब्या बाजूला ठेऊन तोही शेकोटीमध्ये सामील झाला. सदाने समोर बसलेल्या व्यक्तीला न्याहाळून बघीतले परंतु अंधारामध्ये धुसर दिसताना ओळख कांही लागेना. सदाने विचारले, ''कोण हाय?'' समोरची व्यक्ती म्हणाली ''मी पाहुणा माणूस हाय, या गावची सून हाय आमची, त्यामुळे पाहुण्याच्या घरी आलोय.'' सदा म्हणाला ''गांव कोणतं?'' जळतं लाकुड थोडसं पुढं सरकावून पाहुणा म्हणाला ''जवळचंच गाव हाय.'' सदा म्हणाला



''बरं बरं, थंडी कशी हाय तुमच्याकडं'' पाहुणा म्हणाला ''अशीच हाय बघा, वारं अंगाला झोंबून चाललय. नदीकाठचं गांव हाय, तुमच्यापेक्षाही जास्तीची थंडी हाय.'' त्यावर सदा म्हणाला ''हं, पाऊस जास्त झालाय यावर्षी, लवकरच थंडी आलीय, मधीच कधीतर आभाळ आलं तर थंडी कमी होईल, परंतु सध्या आभाळही येत नाही.'' दोघांच्या गप्पामध्ये शेकोटीत सरकवलेले लाकडं जळत आले होते. लहान लहान तुकडे शिल्लक राहीले होते. पेटलेल्या ज्वाला कमी झाल्या होत्या, हातापायाला लागत असलेला शेक कमी झाला होता. गारठलेल्या थंडीत एक कुत्रं शेकोटीच्या उबेला पाहून जवळ आलं. सदाच्या पांघुरणाला चिकटून पाय दुमडुन बसलं. सदानं हाताला कुत्र्याचा स्पर्श झाला, सदानं कुत्र्याच्या पाठीत एक काठी घातली. गारठलेल्या थंडीत कुत्रा जोरजोरात किंचाळत थोडया अंतरावर जाऊन कुडकुडत बसला.

सदानं पुन्हा खिशातून बिडी काढली. शेकोटीवर बिडी पेटवली. शेकोटीतील जळण जळत आलं होतं. थोडाचा जळणाचा आणखी एक गठ्ठा घेतला. आणि दोनचार लाकडं शेकोटीला लावली. हाताच्या मुठीच्या शेवटी बिडी धरुन एक मोठा झुरका मारुन सदा पाहुण्यांना म्हणाला, ''घेता का बिडी?'' पाहुण्याने एक बिडी घेतली. त्यांनीही बिडी पेटवली. एकामागून एक बिडीच्या झुरक्यांचा धूर आणि शेकोटीचा धूर एक झाला. इकडच्या तिकडच्या गप्पा सुरु झाल्या. परंतु शेवटपर्यंत ना एकमेकांनी एकमेकांची तोंडओळख झाली ना पाहुण्याचं नांव काय गांव कोणतं यांची विचारणा झाली? कांहीच न विचारता बस चर्चाच सुरु होती. पुर्वे कडे आकाशाला थोडी लाली वाढली. पाहुणा म्हणाला ''तांबडं फुटलं बघा आता. चला येतो.'' हातात शौचासाठी तांब्या घेऊन पाहुणा शेताच्या दिशेनं चालता झाला.



माधव सूर्यवंशी माकणीकर
मो. 95278 53953

सदा आणखी कांही वेळ जागेवर बसून दोनचार लाकडांचा शेक घेत बसला होता. पुन्हा एक गावातील सहकारी थोडसं जळण घेऊन आला आणि सदाला सामील झाला. दोघांनीही पुन्हा बिडया पेटवल्या आणि शेकोटीच्या धुरामध्ये पुन्हा चर्चा सुरु झाल्या. थंडी कमी झाली की ज्वारीच्या पिके जोमात येतील. गव्हाच्या पिकाला चांगले राहील. आभाळ आलं तर तुरीवर आळया होतील, या थंडी आणि गरमीच्या वातावरणाचा पिकांवर होणारा परिगणाम अशा गप्पांचा सदाचा हा दररोजचा दिनक्रम होता. पहाट झाली की सदाची शेकोटी पेटत असे. रस्त्याने जाणारी येणारी माणसं सदासोबत हातापायाला शेक घेत सदासोबत थोडावेळ गप्पा मारीत असत. रस्त्यावरची सकाळची वर्दळ वाढली शेकोटी थंड व्हायची. पुन्हा दुसऱ्या दिवशी पहाटे पेटायची. शेवटी गप्पा म्हणजे काय असणार. आज काय घडलं. उदया काय होईल या शेकोटीच्याच गप्पा.

ही गोष्ट फक्त सदाच्या बाबतीत नाही. पूर्वी गाव चावडीचे शेजारी अशा शेकोटीची एक जागा निश्चित केलेली असायची. गावातील यसकर गावात पडलेल्या सर्व सेनाच्या गौऱ्या चावडीवर जमा करून ठेवत असे. पहाटेच्या वेळेस चावडीचे शेजारी शेकोटी पडत असे. पहाटेच उठणारी मंडळी येता जाता शेकोटीचा थोडासा शेक घेऊन निघून जात असत. वयस्क मंडळीसाठी सकाळी गप्पांचे ते ठिकाण असायचे.

***




# उल्का वर्षाव : आकाशीय अग्निपुष्पांचे वैज्ञानिक आणि विलोभनीय दर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

धूमकेतूची कक्षा, त्याचा आकार, आणि त्यातील घटक यांवरून त्याचे तेज, उल्कांचा वेग आणि दिसण्याची वारंवारिता ठरते. उदाहरणार्थ, हॅली धूमकेतू पृथ्वीच्या जवळून दर ७६ वर्षांनी जातो, आणि त्याचा माग सोडलेला धूळ पृथ्वीच्या कक्षेत येतो, ज्यामुळे एटा ॲक्वेरिड्स उल्का वर्षाव दिसतो.

उल्का वर्षाव कसा होतो?

उल्का वर्षाव म्हणजे धूमकेतूच्या मागातून येणाऱ्या हजारो उल्कापिंडांचा आकाशीय नृत्य.

पृथ्वी वर्षभर सूर्याभोवती आपली कक्षा पूर्ण करते.

काही ठराविक ठिकाणी ती धूमकेतूच्या मागातून जाते.

या मार्गात येणारे कण वातावरणात प्रवेश करतात आणि प्रचंड वेगाने जळतात.

परिणामी आकाशात एकसंध तेजस्वी रेषांचा वर्षाव दिसतो.

या प्रक्रियेत प्रत्येक उल्का हा जणू एक क्षणिक तारांगणाची ज्योत बनतो, जी काही सेकंदात नष्ट होते, पण मनावर स्थायी प्रभाव टाकतो.

उल्का वर्षावाचे प्रमुख प्रकार आणि कालावधी

वर्षभरात पृथ्वीला अनेक धूमकेतूंच्या मार्गातून जाण्याची संधी मिळते. त्यामुळे उल्का वर्षावाचे काही प्रमुख प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

उल्का वर्षाव – कालावधी – संबंधित धूमकेतू

क्वाड्रंटिड्स –जानेवारी – २००३ EH१

लिरिड्स – एप्रिल – C/१८६१ G१ थटचेर

एटा ॲक्वेरिड्स – मे – हॅली धूमकेतू

पर्सिड्स – ऑगस्ट – स्विफ्टटटल धूमकेतू

ड्रॅकोनिड्स – ऑक्टोबर – २१P/गिअकॉबिनी झिंनर

ऑरायनिड्स – ऑक्टोबर– १P/ हॅलेय

जेमिनिड्स– डिसेंबर – ३२०० फाईथोन

यांपैकी पर्सिड्स व जेमिनिड्स हा आकाशीय नृत्य अनुभवण्यासाठी सर्वाधिक प्रसिद्ध आहेत, जिथे रात्रीच्या आकाशावर एकच वेळी अनेक तेजस्वी रेषा उमटतात.

आपल्याला जर उल्का वर्षा पाहायचा असेल तर आपल्याला आपल्या देशात सर्वसाधारणपणे नोव्हेंबर डिसेंबर या महिन्यामध्ये आपल्याला साध्या डोळ्यांनीही रात्रीच्या वेळी उल्का वर्षा पाहता येतो परंतु उल्का वर्षाव पाहण्यासाठी



रात्रीच्या वेळी प्रकाशापासून दूर खूप उंचा वरती डोंगर माथ्यावर आपल्याला जावे लागते आणि त्या ठिकाणी आपण रात्रभर होणारा उल्का वर्षाव पाहू शकतो आज अशी अनेक ठिकाणी तयार केली आहेत. त्या ठिकाणी आपल्याला उल्का वर्षा पाहण्यासाठी दुर्बिणीची सोयही केलेली असते तिथे जाऊन आपल्याला उल्का वर्षा हा पाहता येतो.

प्राचीन भारतीय आणि इतर संस्कृतींमध्ये उल्का वर्षा व आणि धूमकेतूला पाहिल्यानंतर काही ठिकाणी शुभ आणि अशुभ मानले जात होते. उदाहरणार्थ, राजकीय घटना, युद्ध, एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचा म्हणजे एखादा राजा किंवा किंवा मोठा नेता याच्या मृत्यूची भीती लोकांना वाटत असे, नैसर्गिक आपत्ती येईल याची भीती असे किंवा शुभ-संकेत वाटत असत उल्का वर्षा पाहिला की आपल्या मनातली चांगली गोष्ट घडेल असा संकेतही लोकांना वाटत असेल अशा अनेक कल्पना उल्का वर्षाच्या बाबतीत होत्या. तसेच उल्का वर्षावामुळे एखाद्या व्यक्तीच्या भविष्यावर त्याचा परिणाम होईल असे ज्योतिष शास्त्रज्ञ म्हणत असत.



सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758

परंतु आधुनिक विज्ञान स्पष्ट करतो की, उल्का वर्षाव किंवा उल्कापात यांचा कोणताही थेट ज्योतिषीय संबंध नाही. हा निसर्गातील नियम, गुरुत्वाकर्षण, कक्षीय गती आणि धूमकेतूंच्या मार्गामुळे होणारा खगोलशास्त्रीय घटना आहे.

तथापि, आकाशातील या अद्भुत घटना मानवाच्या मनात कुतूहल, श्रद्धा आणि सौंदर्याची अनुभूती निर्माण करतात, ज्यामुळे त्यांना सांस्कृतिक महत्त्व मिळाले आहे.

उल्का वर्षाव हा फक्त आकाशातील एक दृश्य नसून, तो सृष्टीच्या रहस्याचे दर्शन घडवणारा वैज्ञानिक आणि अलंकारिक अनुभव आहे. धूमकेतूंच्या प्रवासातून पृथ्वीवर येणारे हे अग्निपुष्प मानवाच्या मनात विस्मय, कल्पना आणि आध्यात्मिक आनंद उभा करतात.

ज्या क्षणी एखादी उल्का आकाशातून झेपावते, तेव्हा आपल्याला जाणवते की आपण या विशाल विश्वाचा लहानसा, पण विचारशील घटक आहोत. विज्ञानाने उलगडलेली ही प्रक्रिया, सौंदर्याने साकारलेली ही दृश्ये, आणि अलंकाराने रंगवलेली ही कथा, उल्का वर्षावाला एक अद्वितीय आकाशीय उत्सव बनवतेजो प्रत्येक मानवाच्या मनात दीर्घकाळ चमकदार ठसा सोडतो.






# भारतीय चित्रकार श्रेष्ठच...

**ज्योतिर्मय साहित्य**

दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये सुरीली शाम या ग्रुपचा गझलांचा कार्यक्रम मागील आठवड्यात संपन्न झाला. कैलास मोहिते हे चित्रकार. त्यांनी या गझलांच्या कार्यक्रमासाठी सुंदर पद्धतीने हॉल लाइटव्यवस्थेसह सजवला होता. कैलास मोहिते आणि ममता नरहरी यांनी गायलेल्या गझलांनी ती सायंकाळ रसिकांसाठी स्मरणीय ठरली. दुसऱ्या दिवशी कैलास मोहिते या प्रसिद्ध चित्रकाराचाच ज्येष्ठ गायक, पुरस्कार प्राप्त पद्मविभूषण एस.पी. बालसुब्रमण्यम यांचा कार्यक्रम होता. मी चित्रकार कैलास यास म्हंटलेतुझी चित्रे या कार्यक्रमाला दीपलक्ष्मी हॉलमध्ये रसिकांना बघण्यासाठी सजव. कैलासने या कार्यक्रमासाठी तशी रचना केली तसेच बालसुब्रमण्यम यांच्या गाण्याच्या कार्यक्रमासाठी कार्यक्रमासाठी आगळीवेगळी रचना करीत सुंदर लाइट व्यवस्था केली. गाण्यांच्या या कार्यक्रमाचा आस्वाद सर्व रसिकांनी चित्रे बघत बघत घेतला. सर्वांना ही आगळीवेगळी कल्पना प्रचंड भावली. २२ डिसेंबर आम्ही पुस्तक प्रेमी समुहाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस समारंभ आणि २३ डिसेंबरला लियाकत शेख यांच्या माय बिटस स्टुडिओ चा मराठी हिंदी गाण्यांचा गाणी मनातली हा कार्यक्रम होणार होता. मी चित्रकार कैलासला म्हंटले, हे चित्र प्रदर्शन तसेच असुदे. या कार्यक्रमांना येणारे विद्यार्थी आणि रसिक या चित्रप्रदर्शनाचा लाभ घेतील. सर्वांना हे प्रदर्शन आवडले.

लियाकत शेख यांच्या गाण्याच्या कार्यक्रमानंतर गायक आशुतोष देशपांडे यांची पत्नी गायत्री देशपांडे म्हणाल्या... सर, तुमच्यामुळे आम्हाला कैलास मोहिते या चित्रकाराची सुंदर चित्रे बघण्यास मिळाली. आमच्या मैत्रिणींचे चित्रप्रदर्शन यापूर्वी मोती चौक येथील त्र्यंबक हॉलमध्ये आम्ही भरविले होते. आम्ही ज्या जोशी मॅडम यांच्याकडे चित्र काढणे आणि रंगविणे शिकत होतो, त्यांनी आम्हाला यासाठी चांगले मार्गदर्शन केले होते. माझ्या व इतरांच्या चित्रांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. हे चित्रप्रदर्शन तीन दिवस चालू होते. पहिल्यांदाच माझी चित्रे या चित्रप्रदर्शनात ठेवली असल्याने मला आत्मविश्वास मिळाला. मी त्यांना म्हंटले... यासाठीच हे चित्रप्रदर्शन मी चित्रकार कैलास मोहिते यांना या कार्यक्रमासाठी असेच ठेवण्याची विनंती केली होती. तुमचे व तुमच्या मैत्रिणींचे चित्रप्रदर्शनीही दीपलक्ष्मी हॉलच्या गॅलरीमध्ये भरवूया. प्रत्येक महिन्यामध्ये एकतरी चित्रप्रदर्शन या हॉलमध्ये ठेवण्याचा आमचा मानस आहे. साताऱ्यामध्ये सर्वसामान्यांची



आणि रसिकांची चित्रसाक्षरता वाढविण्यासाठी याचा नक्कीच उपयोग होइल. तसेच ज्याप्रमाणे आपण इतरांना वेगवेगळ्या कारणांसाठी गिफ्ट देतों त्यासाठी अशी चित्रे विकत घेऊन ती त्यांना गिफ्ट देता येतील. तसेच आपल्या घरांमध्ये सुध्दा चित्रे खरेदी करून ती हॉलमध्ये व इतरत्र लावण्यासाठीही ही चित्र प्रदर्शने उपयोगी होतील.

आम्ही कुटुंबिय २०१५ साली युरोप ट्रीपला गेलो होतो. या वीणा वर्ल्ड च्या ट्रीपच्या अंतिम टप्प्यात पॅरीसहून आम्ही माझा पुतण्या अमेय कारखानीस याच्याकडे मँचेस्टरला तसेच माझ्या जावयाची मावशी डॉ. शिल्पा विकास राजे यांच्याकडे लंडनला काही दिवस हा परिसर बघण्यासाठी मुक्काम केला आणि नंतर भारतामध्ये परतलो. त्यावेळी तन्वी विकास राजे ही शिक्षण घेत होती. तन्वीने स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीमध्ये २०२३ मध्ये एम.बी.ए. पूर्ण केले. तन्वी सध्या ॲक्सेल लर्निंग कंपनीमध्ये चीफ ऑपरेटिंग ऑफिसर म्हणून मोठ्या हुद्यावर काम करते. ही कंपनी एक व्यावसायिक शिक्षण कंपनी आहे, जी तंत्रज्ञान; बांधकाम, अभियांत्रिकी आणि आरोग्य क्षेत्रातील कौशल्य विकासावर केंद्रीत आहे. ही कंपनी अल्पाइन इनव्हेस्टर्स' च्या मालकीची असून सॅन फ्रान्सिस्को,कॅलिफोर्निया( ) येथे असून २००० सालापासून कार्यरत आहे. या कंपनीचा मुख्य उद्देश आधुनिक कामगार वर्गाला प्रशिक्षण देऊन विशेष कौशल्यांची कमतरता भरून काढणे हा आहे. ही कंपनी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, ऑनलाइन आणि व्हर्च्यूअल प्रशिक्षण प्रदान करते ज्यामुळे व्यावसायिकांना करिअरमध्ये प्रगती करता येते. मोठ्या पोस्टवर आणि मोठे सॅलरी पॅकेज मिळवित असलेली तन्वी राजे चर्चा करीत असतांना सांगत होती... मी नुकतेच बऱ्याच जणांना कंपनीला काम जसे हवे तसे होत नसल्याने मोबदला देऊन त्यांना दुसऱ्या कंपनीमध्ये काम करण्यासाठी मोकळे केले. उच्चशिक्षीत तन्वी विकास राजे आपल्या कर्तुत्वाने कमी वयामध्ये कंपनीची सुत्रे सांभाळत असताना विविध देशातील ॲक्सेल लर्निंग कंपनीमधील काम करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करते हे महत्वाचे.



शिरीश चिटणीस,
सातारा मो. +91 75888 65051

मला विशेष वाटले म्हणजे तीच्याकडे आयफोन आहे परंतु तो जुन्या मॉडेलचा आहे. आयफोन एक्सआर २०१८ हा अजुनही ती वापरते. तन्वी म्हणते माझे काम या आयफोनने चालते तर मी नवा कशाला घेऊ? पण दुसऱ्या बाजूने तिने नुकतीच साडेतीन लाखाची पेंटींग्ज खरेदी केली. तिचा स्वतःचा फ्लॅट लंडनमध्ये आहे. मोठ्या रकमेचे पॅकेज असलेली तन्वी राजे वेगवेगळ्या कलांच्यामध्ये रस घेत असते. मला आठवतेय आम्ही २०१५ साली घेऊन दिलेला राल्प लॉरेन सनग्लासेसचा गॉगल अजुनही ती वापरते. मला तन्वाच्या चित्रप्रदर्शने, म्युझियम बघणे. चित्रे समजाऊन घेत त्यात रसिकतेने जाण ठेवीत चित्रे खरेदी करून आपल्या संग्रही ठेवणे या तिच्या गुणवैशिष्यांचे कौतुक वाटले. आपण सातारकरांनीही साताऱ्यात वेगवेगळी चित्र प्रदर्शने भरवून आपली चित्रसाक्षरता विकसित करीत चित्रे खरेदी करण्याची रसिकतेची सवय अंगिकारली पाहिजे.

फ्रान्सिस न्यूटन सूझा हे आधुनिक भारतीय चित्रकलेतील एनफंट टेरीबल म्हणून ओळखले जाणारे प्रमुख कलाकार होते. ज्यांनी गोवा, कॅथेलिक संस्कृती आणि युरोपियन प्रभाव यांचा मेळ घालून चित्रांची क्रांतीकारी शैली विकसित केली. चित्रकार टीना अंबानी यांच्या आर्ट फांऊडेशनने २००८ साली ख्रिस्तीज लंडन लिलावात सूझा यांचे ८ ४ फूट आकाराचे बर्थ हे चित्र साधारणपणे साडेदहा कोटी रुपयांना खरेदी केले. हे भारतीय आधुनिक कलेच्या इतिहासात विक्रमी किंमतीचे होते. हे चित्र त्यांनी नंतर मुंबईत न ठेवता अमेरिकेतील पीबॉडी इसेक्स म्युझियम ला प्रदर्शनासाठी उधार दिले. यावरून त्यांच्या कलाखरेदीचा उद्देश गुंतवणुकीइतकाच सांस्कृतिक प्रदर्शन हाही असल्याचे दिसते. हेच चित्र २०१५ मध्ये पुन्हा ख्रिस्तीज न्यूयॉर्क लिलावात विकले गेले. हे चित्र सध्या किरण नाडार यांच्याकडे आहे. त्यांनी सप्टेंबर २०१५ मध्ये हे चित्र ४.०८ दशलक्ष डॉलर्सला विकत घेतले. भारतीय चित्रकारांच्या चित्रांना जगभरात मागणी वाढत आहे. या क्षेत्रात आपल्या गुणवैशिष्ट्याने प्रगती करणाऱ्या चित्रकारांना नक्कीच वाव आहे.

****

# लेखणी आणि माणुसकीचा संगम : युवा पत्रकार अविनाश घोगरे


**ज्योतिर्मय साहित्य**

मच्छिंद्रनाथ चिंचोलीच्या मातीतून उगवलेला आणि आपल्या लेखणीच्या बळावर तालुक्याच्या पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण करणारा युवा पत्रकार अविनाश घोगरे यांचा आज वाढदिवस! केवळ पत्रकार म्हणूनच नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाचा हक्काचा माणूस म्हणून त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

छोट्या गावातून मोठ्या मंचावर पोहोचताना अविनाश घोगरे यांनी कधीही आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यांची सडेतोड, निर्भीड आणि प्रखर लेखनशैली नेहमीच अन्यायाविरुद्ध ठामपणे उभी राहिली आहे. दुर्बल, वंचित आणि दुर्लक्षित घटकांचे प्रश्न त्यांनी सातत्याने मांडले; त्यांना शब्द दिला, आवाज दिला आणि तो थेट शासनदरबारी पोहोचवला. त्यामुळेच त्यांना लाभलेली ''लेखणीचा पैलवान'' ही उपाधी पूर्णतः सार्थ ठरते.

पत्रकारितेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही अविनाश घोगरे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. आत्महत्या ग्रस्त कुटुंबे, निराधार व गरजू

शब्दांकन
मुद्दशिर बेग
पत्रकार, घनसावंगी



व्यक्तींच्या समस्या असोत किंवा आपत्तीग्रस्त नागरिकांचे दुःखऱ्या सर्व वेदनांना त्यांनी आपल्या लेखणीद्वारे समाजासमोर मांडले. समाजभान टीमचे दादासाहेब थेटे यांच्या माध्यमातून अनेक गरजू कुटुंबांना प्रत्यक्ष मदत मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा सहभाग राहिला आहे. सांगलीकोल्हापूरचा महापूर असो वा गोदावरीकाठचा पूर, मदतकार्याचे हात पुढे करण्यामध्ये ते नेहमीच अग्रभागी राहिले. दीपावलीसारख्या सणात गरजूंपर्यंत आनंदाचा फराळ पोहोचवणे हाच त्यांच्या दृष्टीने खरा सण आहे.

हसतमुख चेहरा, दिलखुलास स्वभाव आणि संवेदनशील मन यांचा सुंदर संगम म्हणजे अविनाश घोगरे. मित्रांसाठी जीव ओवाळून टाकणारे, मात्र अन्यायावर कठोर भूमिका घेणारे हे व्यक्तिमत्त्व आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जाते. त्यांच्या तडफदार बोलण्यात असलेली विनोदाची किनार त्यांना सहजच सर्वांच्या मनात घर करून देते.

पत्रकारितेतील सातत्य, सामाजिक कार्यातील जिद्द आणि माणुसकीतील ममत्व या त्रिसूत्रीमुळे अविनाश घोगरे आज अनेक तरुण पत्रकारांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांच्या लेखणीची धार, सामाजिक जाणिवेची उंची आणि माणुसकीची ऊब अशीच कायम राहो, हीच मनापासून शुभेच्छा. वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा, अविनाश घोगरे! तुमची लेखणी नेहमीच सत्य, न्याय आणि समाजहितासाठी झुंजत राहो!

# ९९ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलना निमित्त साहित्य प्रेरणा ज्योतीचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**खटाव –** प्रत्येक तालुक्यातून साहित्य प्रेरणा ज्योत निघणार आहे. खटाव तालुक्यातून महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा – पुसेगाव व साहित्य ज्योत समिती यांच्या वतीने महात्मा ज्योतीराव फुले यांची कुलभूमी असलेल्या कटगुण येथून एक जानेवारी २०२६ रोजी सकाळी दहा वाजता ज्योत निघणार आहे. आमदार सन्माननीय महेश शिंदे साहेब व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. प्रियाताई शिंदे यांच्या हस्ते महात्मा फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करून साहित्य प्रेरणा ज्योत प्रज्वलित करण्यात येणार आहे. महात्मा फुले स्मारक समितीचे पदाधिकारी, महाराष्ट्र साहित्य परिषद– शाखा पुसेगावचे सर्व पदाधिकारी खटाव तालुक्यातील सर्व साहित्यिक, शिक्षक, ग्रामस्थ महात्मा फुले माध्यमिक विद्यालय कटगुण व महात्मा फुले आश्रम शाळा कटगुणचे विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित राहणार आहेत. पुसेगाव मध्ये ढोल ताशाच्या गजरात ज्योतीची भव्य मिरवणूक शासकीय विद्यानिकेतन ते सेवागिरी मंदिरापर्यंत काढण्यात येणार आहे.त्यामध्ये सर्व संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय पुसेगाव, श्री. हनुमानगिरी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज पुसेगाव,श्री सेवागिरी कला वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव, डॉ. राधाकृष्णन इंग्लिश मीडियम स्कूल पुसेगाव, शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव, मधील सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद व ग्रामस्थ या साहित्यिक प्रेरणा ज्योतीमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती साहित्य प्रेरणा ज्योत समितीचे सदस्य व संयोजन समितीच्या वतीने श्री नितीन जाधव सर व सौ.रंजना सानप,डॉ.संजय क्षीरसागर, प्रा. जे. बी.जाधव, सुसेन जाधव, संतोष शिंदे यांनी दिली.

# वादाशिवाय साहित्य संमेलन व्हावे!

**ज्योतिर्मय साहित्य**

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १ ते ४ जानेवारी दरम्यान सातारा येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखक पानिपतकार विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला सातारा नगरी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. तब्बल ३२ वर्षानंतर सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. सातारा हे केवळ ऐतिहासिक वारसा आणि निसर्गसौंदर्यासाठीच प्रसिद्ध नाही तर साहित्य आणि कला यांचे केंद्र म्हणूनही प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेले हे शहर मराठी साहित्याच्या या महाकुंभाचे आयोजन करण्यास सज्ज झाले आहे. राज्य सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असलेले शिवेंद्रराजे भोसले हे या साहित्य संमेलनाचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार हे देखील या साहित्य संमेलनाला उपस्थित राहणार आहे. हे साहित्य संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा व मावळा फाऊंडेशन यांच्या मार्फत आयोजित केले जात आहे. या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून मराठी साहित्य रसिक या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्वास आयोजकांना आहे. साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन मराठी साहित्य रसिकांना पर्वणीच ठरणार आहे. यावेळच्या साहित्य संमेलनाला मोठ्या प्रमाणात रसिक भेट देतील यात शंका नाही त्यामुळेच साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही. या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे. संमेलनाचेअध्यक्ष विश्वास पाटील यांच्या भाषणाकडे साहित्य वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वर्षापासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे. साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात. साहित्य रसिकही साहित्यिकांचे मत, विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो. माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो. त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा. आजचे तरुण सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात. तरुण वर्गाला साहित्य संमेलनामध्ये आकर्षित करायचे असेल आयोजकांनी साहित्य संमेलनाला समाज माध्यमांशी जोडावे. आयोजकांनी साहित्य संमेलनाचे सर्व अपडेट फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर या सारख्या समाज माध्यमांवर द्यावीत म्हणजे तरुणाईत देखील साहित्य संमेलन लोकप्रिय होईल. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेल्या साताऱ्यात होत असलेल्या हे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकप्रिय होऊन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल ही अपेक्षा . ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

***




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559